वर्ष २०१७-२०१८ अंक १

BJS
Bharatiya Jain Sanghatana

# शांतिदूत

## कॉलेज वार्तापत्र

दिनांक २६ जानेवारी २०१८

संपादक : प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बकोरी फाटा, वाघोली, पुणे – ४१२ २०७

**Vision** " Exploring youth capabilites for Social services"
**Mission** " Persuasions of Arts Science and Commerce with Vocational training based on Concept of earm-as-you-learn principles and plethora of extra - curricular activites to ensure all around growth"

### जगाचे नेतृत्व करण्याची ऊर्जा भारतीय विद्यार्थ्यांमध्ये आहे... डॉ. अरविंद शाळीग्राम

वाघोली : विद्यार्थ्यांनी आता केवळ परीक्षार्थी न होता आपल्या बुद्धीचा वापर समाजाच्या विकासासाठी करण्यासाठी अधिक ऊर्जा निर्माण केली पाहिजे, त्या ऊर्जाद्वारे जगाचे नेतृत्व करण्याची ताकद भारतीय विद्यार्थ्यांमध्ये आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अरविंद शाळीग्राम यांनी 'रासेयो' ने आयोजित केलेल्या शिक्षक दिन व महाविद्यालय वर्धापन दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रसंगी 'बीजेएस'चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. प्रफुल्लजी पारख, विकास अधिकारी श्री. सी. आय. कोचर, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, श्री. राकेश जैन व विद्यार्थी प्राचार्य विकास तळोले उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी बीजेएस संस्था व कॉलेजच्या स्थापनेपासूनच्या कार्याचा आढावा मनोगतातून व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. प्रफुल्ल पारख यांनी नमूद केले की, आजच्या शिक्षकांनी माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार आत्मसात करून तशा पध्दतीने वाटचाल सुरू केली तर खऱ्या अर्थाने आपण विद्यार्थी घडविण्यात यशस्वी झालो, असे म्हणता येईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनीषा बोरा यांनी केले. आभार प्रा. राजाभाऊ जमदाडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सचिन कांबळे यांनी केले.



शिक्षक दिनानिमित्त कु. शिवले धनश्रीचा सत्कार करताना मा. प्रफुल्लजी पारख आणि सा. फु. पु. वि. कुलसचिव डॉ. अरविंद शाळीग्राम,बीजेएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबसाहेब सांगळे

### संशोधनाची सांस्कृतिक चळवळ विद्यार्थ्यांमध्ये रूजणे काळाची गरज... डॉ. एन. एस. उमराणी

वाघोली : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची सांस्कृतिक चळवळ रुजण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुरू केलेल्या आविष्कार स्पर्धेतून अनेक विद्यार्थी नवभारताच्या निर्मितीसाठी योगदान देत असल्याचे दिसून येत आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी यांनी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित केलेल्या संशोधन आविष्कार २०१७ पुणे जिल्हा विभागीय पातळीवरील पोस्टर प्रदर्शन कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मत व्यक्त केले. तर डॉ. के. सी. मोहिते म्हणाले, ज्या ज्या देशांनी शिक्षण संशोधनाची कास धरली आहे, ते देश जगाच्या उच्च स्थानावर गेल्याचे दिसून येत आहे. हे तंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करुन शास्त्रज्ञांप्रमाणे संशोधन केले पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय स्थानावरून डॉ. बाबासाहेब सांगळे म्हणाले, ''उच्च शिक्षणामध्ये संशोधनाला अधिक वाव आहे, हे ओळखून विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार संशोधन क्षेत्रात संशोधन केले तर ते अभ्यासपूर्ण संशोधन होईल.'' कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. रवींद्र जायभाये, डॉ. मोहन वामन, विकास अधिकारी मा. सी. आय. कोचर, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते. पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून ११० पोस्टर्स या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी मांडले. त्यामध्ये ३० विद्यार्थी विजेते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रूपाली गुलालकरी यांनी केले. आभार डॉ. भूषण फडतरे यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. माधुरी देशमुख, डॉ. सहदेव चव्हाण यांनी केले.



पुणे विभागीय पातळीवरील पोस्टर प्रदर्शन संशोधन आविष्कार २०१७ कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करताना सा. फु.पु. वि. प्र. कुलगुरु, डॉ. एन. स. उमराणी आणि सी.टी.बोरा कॉलेजचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते

### बीजेएस महाविद्यालयात युवा सप्ताह संपन्न



युवा सप्ताह समारोप प्रसंगी सा. फु. पि.पु. माजी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ आणि प्राचार्य बाबासाहेब सांगळे

जगातील यशस्वी लोकांची जीवन चरीत्र वाचल्याने आपल्याला त्यामधून पुढील काळात चांगले जीवन जगण्याची उर्मी मिळते असे डॉ. अरूण अडसूळ यांनी बीजेएस कॉलेज मधील राष्ट्रीय सेवा योजनेने आयोजित केलेल्या युवा सप्ताहच्या समारोप प्रसंगी मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे म्हणाले युवा सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवन चरित्राचे पारायण करून त्यांचे विचार, आचार आत्मसात करावे.

युवा सप्ताहाच्या प्रसंगी काव्यवाचन, रांगोळी, मेहंदी, फोटोग्राफी, पाककला अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याशिवाय व्हाईट डे, रेड डे, मिसमॅच डे, साडी डे, जीन्स व टाय डे व पारंपारिक पोशाख डे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजाभाऊ जमदाडे यांनी केले, आभार उपप्राचार्य किशोर देसर्डा तर सूत्रसंचालन प्रा. मनीषा बोरा यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा.सचिन कांबळे, डॉ. ज्योती थोरात, डॉ. सुनील ठाकरे, प्रा. शोभा कोकाटे, श्री. गिरीषकुमार शहा, विद्यार्थी प्रतिनिधी नितीन भुजबळ, कु. माधुरी पाटील यांनी केले.

### मुक्तचिंतन आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न



स्व.पी. सी. नहार स्मरणार्थ आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचा फिरता चषक प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांच्या हस्ते स्विकारताना बीजेएस कॉलेजच्या विद्यार्थीनी शांभवी फडतरे आणी विशाखा साकोरे

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील सांस्कृतिक मडळांतर्गत स्व. पी. सी. नहार स्मरणार्थ मुक्तचिंतन आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचा फिरता चषक बीजेएस कॉलेजच्या विजेत्या संघाने पटकाविला, तर प्रथम क्रमांक प्रवीण शिंदे - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (३००१ रुपये बक्षीस) द्वितीय क्रमांक आकाश पाटील - डी.वाय.पाटील कृषी महाविद्यालय,पुणे (२००१ रुपये बक्षीस) तृतीय क्रमांक आनंद मसलखांब - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (१५०१ रुपये बक्षीस) व उत्तेजनार्थ विशाखा साकोर- बीजेएस कॉलेज वाघोली व हृषीकेश पाखले - शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे(१००१ रुपये बक्षीस)ह्या विद्यार्थ्यांना बक्षीसे मिळाली. स्पर्धेचे परीक्षक डॉ. संजय घोडेकर व डॉ. पांडुरंग कंद ह्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे ह्यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख डॉ. सहदेव चव्हाण व प्रा. सचिन कांबळे, कु. माधुरी पाटील, प्रसाद पऱ्हाड ह्यांनी केले होते.

### बीजेएस महाविद्यालयास बॉक्सींग स्पर्धेत विजेतेपद



बॉक्सींग स्पर्धेत विजेत्या संघाचे कौतुक करताना प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे व विकास अधिकारी श्री. सी. आय. कोचर

वाघोली : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, क्रीडा विभाग व पुणे जिल्हा क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यलयात आंतर महाविद्यलयीन बॉक्सिग स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ४० महाविद्यालयातील ९० फुले खेळाडू व ५० मुली खेळाडू सहभागी झालेले होते.

स्पर्धेचे उदघाटन छत्रपती पुरस्कार विजेत श्री. पद्‌माकर फड व अर्जुन पुरस्कार विजेते श्री. मनोज पिंगळे ह्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या प्रसंगी बीजेएस संकुलाचे प्रकल्प व्यवस्थापक मा. सुरेश साळुंके, महाविद्यालय विकास अधिकारी मा. कोचर सी. आय., महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संतोष भंडारी उपस्थित होते. सदर स्पर्धेत भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास मुलींच्या गटास विजेतेपद मिळाले तर मुलांच्या गटात आर. जे. एस. पी. एम. महाविद्यालय, भोसरी या महाविद्यालयास विजेतेपद मिळाले. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा विभागप्रमुख डॉ. रमेश गायकवाड, श्री. गिरीश शहा, श्री. सूर्यकांत दुधभाते यांनी केले.

संपादक – प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे
कार्यकारी संपादक – डॉ.भूषण फडतरे,
सदस्य – प्रा. सहदेव चव्हाण, प्रा. शिवाजी सोनवणे, प्रा.शोभा कोकाटे, डॉ. मोनिका जैन,प्रा.नागनाथ माने

शांतिदूत संपादक मंडळ

विनामूल्य वाटप करण्यासाठी शांतिदूत हे भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्तापत्र संपादक प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी प्रकाशित करून कार्यकारी संपादक प्रा. डॉ. भूषण फडतरे यांनी प्रसिद्ध केले. अंक सजावट व मुद्रण : श्री राज प्रिंटर्स मुद्रणालय, पुणे.

## बीजेएस वसतिगृहात रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न



रक्षाबंधन निमित्त कार्यक्रमात उपस्थित प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, श्री. चंद्रशेखर लुंकड, सौ. कमलताई कांकरिया

वाघोली : बहिण - भावाचे नाते हे आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये सर्वांत श्रेष्ठ असल्याने रक्षाबंधनाला अधिक महत्त्व आहे. अशा नात्यामुळेच समाजाचे स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होते, असे बीजेएस कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी बीजेएस वसतिगृहात साजरा केलेल्या रक्षाबंधनाच्या कार्यक्रमात आपले मत व्यक्त केले. या प्रसंगी बीजेएस संकुलाचे प्रकल्प व्यवस्थापक मा. श्री. सुरेश (बापू) साळुंखे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संतोष भंडारी, आई प्रतिष्ठान वाघोलीच्या आधारस्तंभ सौ. कमलताई कांकरिया व सौ. सुनंदाताई कोचर यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

बीजेएस महाविद्यालय व वाघोलीतील आई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १२ वर्षांपासून वसतिगृहात राहणाऱ्या अनाथ, आदिवासी व महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना सातत्याने रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या प्रसंगी बीजेएस शैक्षणिक संकुलाचे विकास अधिकारी श्री. सी. आय. कोचर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, आई प्रतिष्ठानचे सदस्य मा. चंद्रशेखर लुंकड, प्रकल्पातील वैद्यकीय अधिकारी सौ. संगीता लगड, प्रा. मनीषा बोरा, डॉ. ज्योती मगर हे उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे उद्घाटन

वाघोली : स्पर्धा उदघाटन प्रा. पांडुरंग पवार ह्यांच्या हस्ते झाले. स्पर्धा परीक्षा समिती मार्फत प्रा. बाबासाहेब मुंडे ह्यांचे स्पर्धा परीक्षा आणि राज्यशास्त्र ह्या विषयावर व्याख्यान झाले, तसेच प्रा. स्वागत दरख ह्यांचे 'स्पर्धा परीक्षाची तयारी कशी करावी' ह्याबद्दल व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डी. आर.अंजळ , प्रा. सचिन कांबळे व प्रा. एस. एन. हांडे ह्यांनी केले होते.

## बीजेएस महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन



रक्तदान शिबिर प्रसंगी बीजेएस वसतिगृहाचे प्रकल्प व्यवस्थापक मा. सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, मुख्याध्यापक श्री. संतोष भंडारी व इतर

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. शांतिलालजी मुथ्था यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ससून प्रादेशिक रक्तपेठी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन मा. सुरेश साळुंखे, प्रकल्प व्यवस्थापक, बीजेएस संकुल यांच्या हस्ते झाले. ५० विद्यार्थी, कर्मचारी यांनी रक्तदान केले. या प्रसंगी विकास अधिकारी मा. सी. आय. कोचर, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संतोष भंडारी, कार्यालय अधीक्षक शशिकांत केसकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. राजाभाऊ जमदाडे, प्रा. मनीषा बोरा, प्रा. सचिन कांबळे, प्रा. सुनील ठाकरे, डॉ. रमेश गायकवाड आदी प्राध्यापक उपस्थित होते.

## बीबीए विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन

वाघोली : विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी बीबीए विभागामार्फत IT Industry visit, coding competation, Group Discussion, Quiz competation, soft skills, Ethical haking, website designing, Advance excel, Aptitude training स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले होते. ह्या कार्यक्रमात विविध विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे ह्यांनी मार्गदर्शन केले, तर उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, प्रा. शिल्पा दंडे, प्रा. सीमा डांगे, प्रा. शिवानी महाजन, प्रा. हनुमंत जगताप, प्रा. भाग्यश्री जोशी, प्रा. वैशाली महाडिक, श्री. तानाजी जाधव व एकनाथ नाईक, ह्या सर्वांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

## ७५ वा क्रांति दिन साजरा




क्रांतिदिनानिमित्त सा. फु. वि. पु. इतिहास विभागातील प्रा. बाबासाहेब दुधभाते मनोगत व्यक्त करताना

वाघोली : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील शेवटचे व अंतिम आंदोलन असणाऱ्या 'छोडो भारत' आंदोलनात जनसामान्य लोकांनी घेतलेला सहभाग हा स्वातंत्र्य प्राप्तीची नांदी ठरली आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक बाबासाहेब दुधभाते यांनी बीजेएस कॉलेजमधील मानवविज्ञान शाखा मंडळ व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ७५ व्या क्रांतिदिनानिमित्त मत व्यक्त केले. पुढे ते म्हणाले, आज स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे होत आहेत. ज्यांनी बलिदान दिले त्यांचा अभिमान बाळगून आपणही देशासाठी त्यागाची भूमिका ठेवली तर खऱ्या अर्थाने आज क्रांतीदिन साजरा केल्याचे सार्थक होईल असे वाटते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे उपस्थित होते. क्रांतिदिनानिमित्त 'छोडो भारत' आंदोलनातील दुर्मिळ घटनांवर आधारित भित्तिपत्रक प्रसिध्द केले. तसेच देशभक्तीपर समूहगीत व काव्यवाचन घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. भूषण फडतरे यांनी केले, आभार डॉ. ज्योतिराम मोरे, तर सूत्रसंचालन प्रा. सचिन कांबळे यांनी केले.

## बीजेएस कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न

वाघोली येथील भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानाने बहि:शाल शिक्षण मडळांतर्गत तीन दिवसीय डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न झाली. व्याख्यानमालेत प्रा. दशरथ यादव ह्यांचे पंढरीचीवारी - महाराष्ट्राची दौलत, प्रा. प्रकाश पांढरमिसे ह्यांचे छत्रपती शिवराय व आजची तरुणाई व प्रा. सुनीताराजे पवार ह्यांचे माणसे मोठी कशी होतात ह्या विषयांवर व्याख्याने झाली.

व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन बहि:शाल शिक्षण मंडळ समितीचे प्रमुख प्रा. सुभाष शिंदे ह्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संगीता पठारे ह्यांनी, तर आभार प्रा. सचिन कांबळे यांनी मानले.

## निसर्ग मंडळ आयोजित जागतिक ओझोन डे : सायकल रॅली



जागतिक ओझोन दिनानिमित्त आयोजित केलेली सायकल रॅली.

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील निसर्ग मंडळ अंतर्गत जागतिक आझोन दिनानिमित्ताचे औचित्य साधून शनिवार दि. १६ सप्टेंबर २०१७ रोजी पर्यावरण जागृती पोस्टर प्रदर्शन, पर्यावरण संवदेना - प्रश्नमंजुषा स्पर्धा, महाविद्यालय परिसर वाहन मुक्त व बी.जे.एस. महाविद्यालय ते जे.एस.पी.एम. कॉलेज वाघोली कॅम्पस येथे सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.सायकल रॅलीचा प्रारंभ बीजेएस कॉलेजपासून झाला तर सांगता समारंभ जे. एस. पी. एम. कॅम्पसमध्ये झाला. कार्यक्रमाचे संयोजन निसर्ग मंडळ व वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. देविदास पाटील यांनी केले, तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. ज्योतिराम मोरे, प्रा. धनश्री उदावंत , प्रा. आरती सरोदे, प्रा. शिवानी महाजन, प्रा. सीमा डांगे यांनी सहकार्य केले.

## बीजेएसमध्ये वाणिज्य विभागातर्फे विविध व्याख्यानांचे आयोजन

वाघोली : विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना आपल्या अंगी कोणते स्किल आहे, हे प्रथम समजावून घेतले तर ते पुढील आयुष्यात यशस्वी होतात, असे पुणे येथील एस संटरचे व्यवस्थापक श्री.सचिन जाधव ह्यांनी बीजेएस कॉलेजमधील वाणिज्य विभागातर्फे आयोजित केलेल्या व्याख्यानामध्ये मत व्यक्त केले. पुढे ते म्हणाले आधुनिकतेच्या काळात विद्यार्थ्यांनी संगणकाची माहिती घेतली पाहिजे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बळवंत लांडगे ह्यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नागनाथ माने ह्यांनी , तर आभार प्रा.आदिती कोचर यांनी मानले.